## कृषि उद्योगासाठी व्हेंचर कॅपिटल अर्थ सहाय्य योजना (Venture Capital Assistance Scheme for Agribusiness)

शेती हा देशातील खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठा व्यवसाय आहे. सर्वसामान्य लोकांच्या खाण्या-पिण्याच्या सवयीमध्ये होत असलेल्या बदलामुळे या क्षेत्राच्या विकासामध्ये भरपुर वाढ होत आहे. त्यामुळे मुल्यवर्धित अन्न पदार्थ उत्पादनाच्या वाढत्या मागणीमुळे शेती व्यवसायाच्या विकासाच्या वाढीला प्रचंड वाव आहे. या व्यवसायाच्या यशस्वी विकासासाठी नाविन्य व भागीदारीची अत्यंत गरज आहे. कृषि उद्योग हे शेती उत्पादनाच्या विक्रीसाठी पहिली बाजारपेठ असून त्याच्या वाढीसाठी व्यक्तिगत प्रयत्नांची गरज आहे. कृषि व्यापार क्षेत्रामध्ये प्रामुख्याने लघु व मध्यम उद्योगांचे योगदान मोठे आहे. नवीन कृषि उद्योग विकासामध्ये असणारे प्रमुख अडथळे म्हणजे उच्च तंत्रज्ञानाची माहिती व पतपुरवठा उपलब्ध न होणे. या पार्श्वभुमीवर शेतीकडे केवळ उपजिवीकेचे साधन म्हणून न पाहता नवनी तंत्रज्ञान व प्रशिक्षणाच्या सहाय्याने शेती मालाचे मुल्यवर्धन करणे आवश्यक आहे. कृषि पुरक व कृषि प्रक्रिया उद्योगांना चालना देणे त्या योगे कृषि प्रक्रिया उद्योगांचे जाळे देशभर उभारणे अपेक्षित आहे.

केंद्रीय लघू कृषक कृषि व्यापार संघाचा (SFAC) , वित्तीय सहभागातून कृषि उद्योग विकासास चालना देण्यासाठी कृषि उद्योग सुरु करण्यासाठी सहाय्य करणे आणि त्याचबरोबर प्रकल्प सुविधा (Project Deveopment Facility) च्या माध्यमातून बँकेशी निगडीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे हा महत्वाचा हेतू आहे.

**योजनेचे उददेशः**

१. भारतीय रिझर्व बँकेने अधिसूचित केलेल्या अशा वित्तीय संस्था ज्यांमध्ये केंद्र/राज्य सरकारचे ५० टक्क्यांपेक्षा जास्त मालकी आहे, जसे राष्ट्रीयकृत बँका, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि तिच्या सहाय्यक बँका, आयडीबीआय, लघु उद्योग विकास बँक ऑफ इंडिया, नाबार्ड, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ, ॲक्सिस बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक तसेच राज्य वित्तीय निगम, उत्तर पुर्वी विकास वित्त महामंडळ लि.इ.च्या सहकार्याने कृषि उद्योग उभारणीस चालना देणे.
२. कृषि उद्योग प्रकल्पामध्ये खाजगी गुंतवणुक करण्यास प्रोत्साहन देऊन त्याद्वारे ग्रामीण भागातील उत्पन्न व रोजगार वाढविणे.
३. कृषि उद्योग प्रकल्पाद्वारे कच्च्या मालाचे उत्पादन व त्यावरील प्रक्रीया साखळी मजबुत करणे.
४. प्रकल्प विकास सुविधेद्वारे मुल्य साखळीतील सहभाग वाढविण्यासाठी शेतकरी, उत्पादक गट, पदवीधारकांना सहाय्य करेल.
५. प्रक्रिया उद्योगासंदर्भात कृषि उद्योजकाचे प्रशिक्षण आणि भेट इ.कार्यक्रम आयोजित करणे.
६. केंद्र/राज्य छोटया शेतक-यांचा कृषि व्यापार संघाची उभारणी व मजबुती करणे.

**योजनेची ठळक वैशिष्टये:**

प्रकल्पांना आर्थिक सहाय्य करणा-या अधिसूचित वित्तीय संस्था/बँक यांची शिफारस प्राप्त झालेल्या पात्र प्रकल्पांना कृषि व्यापार संघामार्फत बिनव्याजी भांडवली कर्ज देण्यात येईल. सदर बिनव्याजी भांडवली कर्ज वित्तीय सहाय्य करणा-या अधिसूचित वित्तीय संस्थांची/बँकांद्वारे दिलेले मुदत कर्जाची परतफेड वेळा-पत्रकानुसार किंवा त्यापुर्वी परतफेड केल्यानंतर लघु कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांना परत करण्यात येईल.

**योजने अंतर्गत पात्र प्रकल्पः**

१. कृषि किंवा कृषि संलग्न क्षेत्रातील किंवा कृषि सेवांशी संबंधित प्रकल्प. कुक्कुटपालन व दुग्धव्यवसायाशी निगडित प्रक्रिया प्रकल्पांचा समावेश यात करण्यात येईल.
२. शेतकरी/ उत्पादक गट यांना हमखास बाजारपेठ उपलब्ध करून देणारे प्रकल्प.
३. शेतक-यांना विविध उच्चमूल्यांकीत पिके आणि त्यांचे उत्पन्न वाढीसाठी प्रोत्साहन देणारे प्रस्तावित प्रकल्प आणि
४. बँकेने मुदत कर्ज मंजूर करण्यासाठी स्वीकारलेले प्रकल्प हे या योजनेअंतर्गत सुविधेचा लाभ घेण्यास पात्र आहेत.

**योजने अंतर्गत कर्ज मर्यादाः**

या योजनेमध्ये मिळणारे अर्थसहाय्य हे प्रकल्प खर्चावर अवलंबून असून बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्पामधील बँकांची कर्जाची रक्कम वगळता उद्योजकांनी स्वतः केलेल्या गुंतवणूकीच्या २६ टक्के एवढी रक्कम तसेच शेतकरी उत्पादक कंपनीने (FPC) पुरस्कृत केलेल्या कृषि उद्योंगास त्यांच्या स्वगुंतवणूकीच्या किमान ४० टक्के आहे.

या योजने अंतर्गत अधिकतम अर्थसहाय्याची मर्यादा ही रु.५०.०० लाख पर्यंत आहे.

प्रस्तावित कृषि प्रक्रिया प्रकल्पाची किंमतही किमान रु.१५.०० लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त व कमाल मर्यादा रु.५०० लक्ष इतकी असावी. तथापि, अनुसुचित म्हणून मागास जिल्हयांमध्ये प्रकल्प किंमत रु.१०.०० लक्ष आणि त्यावरील असेल. प्रकल्पास जास्त बिनव्याजी भांडवली कर्ज देण्याबाबत लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांच्या कार्यकारी समितीला अधिकार राहतील.

लाभार्थी यांनी सविस्तर अहवाल बँकांना सादर करणे आवश्यक आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल मिळाल्यानंतर बँका त्याचे मूल्यमापन करुन आवश्यक मुदत कर्ज लाभार्थ्यास मंजूर करतात. बँका या योजनेचे निकष व

योग्य ते नुसार प्रकल्पास लागणा-या बिनव्याजी भांडवल कर्ज रक्कम ठरवून लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांचेकडे शिफारशीसह कळवितात. लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली हे बँकेने शिफारस केलेली रक्कम लाभार्थ्यास उपलब्ध करुन देण्याकरीता बँकेस सादर करतात ती रक्कम बँक प्रकल्प उद्योगास टप्प्या-टप्याने अथवा एकर कमी भांडवल स्वरुपात (बँकेला योग्य वाटेल त्याप्रमाणे) उपलब्ध करुन देतात.

बँकेकडून घेतलेल्या मुदत कर्जाची संपूर्ण परतफेड होईपर्यंत लघू कृषक कृषि व्यापार संघाकडून मिळणारे अर्थसहाय्य हे बिनव्याजी भांडवली कर्ज स्वरुपात राहते आणि नंतर ही रक्कम आपोआप मुदतकर्ज म्हणून रुपांतरीत होते. या सर्व रकमेची परतफेड होईपर्यंत ही रक्कम मुदतकर्ज म्हणूनच राहील. लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांचेकडून मिळालेले अर्थसहाय्य हे मुदत कर्जात रुपांतरीत झाल्यानंतर कर्जाची रक्कमही लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांना एक रकमी अथवा चार हप्त्यात मुदत कर्जावर ठरविलेल्या व्याजासह परत करावयाची असते.

मुदत कर्जाच्या कालावधीत उद्योजकाकडे असणारी प्राथमिक अथवा तत्सम मालमत्ता बँकेकडे तारण म्हणून राहते आणि बिनव्याजी भांडवली अर्थसहाय्य रकमेची संपूर्ण परतफेड झाल्याशिवाय तारण मालमत्ता बँकेकडून लाभार्थ्यास/दुस-या संस्थेस दिली जात नाही. बँकेकडील कर्जाच्या परतफेडीचे वेळापत्रक लघू कृषक कृषि व्यापार संघाला उपलब्ध करुन देण्यात येते.

प्रकल्प अमंलबजावणी बाबतची प्रगती, मुदतकर्जाची केलेली परतफेड आणि प्रकल्पाची सद्यःस्थिती याबाबतची माहिती उद्योजकास लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांना अवगत करावी लागते. बँकेने लघू कृषक कृषि व्यापार संघाकडून मिळालेल्या निधीचा वेगळा हिशोब ठेवून रक्कम प्रकल्प कार्यवाहीसाठी उद्योजकास जशी लागेल तशी उपलब्ध करुन द्यावयाची असते. उद्योजकाने नियोजित वेळापत्रकानुसार बिनव्याजी भांडवली अर्थसहाय्य परत केलेले असेल तर त्यानंतर दुस-या बिनव्याजी भांडवली अर्थसहाय्याचा लाभ घेवू शकतात.

**पात्र व्यक्ती:**

या योजने अंतर्गत व्यापारक्षम कृषि प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी खाजगी व्यक्ति, शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, भागीदारी /मालकीचे उद्योग, स्वयंसहाय्यता गट, कंपनी, कृषि उद्योजक, कृषि निर्यात क्षेत्रातील उद्योग, व्यक्तीगत कृषि पदवीधर अथवा कृषि पदवीधरांच्या गटास सहाय्य देण्यात येते. व्यावसायिक व्यवस्थापन व जबाबदारीची जाणीव वाढविण्यासाठी गट शक्यतो कंपन्या किंवा उत्पादक कंपनीमध्ये स्थापन करण्याची गरज असते.

**प्रकल्प उद्योजकाची भूमिका:**

उद्योजकयांनी कृषि प्रकल्प यशस्वी करण्यासाठी कर्ज मंजूरीच्या वेळी ठरविलेल्या वेळा-पत्रकानुसार प्रकल्पाची सुरुवात करणे आवश्यक असते. लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांचे बिनव्याजी भांडवली कर्ज पूर्ण परतफेड करेपर्यंत उद्योजकांना ते बँकांकडे एफडीआरसह सुरक्षा जामीन ठेवण्याची हमी द्यावी लागते. बँकेच्या मुदत कर्जाची परतफेड केल्यानंतर उद्योजकांना बँकेकडील तारण हे लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांचेकडे वर्ग आवश्यक असते व केंद्रीय कृषि व्यापार संघाकडील बिनव्याजी कर्जची परतफेड करण्याची ही कार्यवाही सुलभ होण्याकरीता कृषि व्यापार संघाबरोबर करार करणे आवश्यक असते. लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली हे प्रकल्प अंमलबजावणीवर पूर्ण नियंत्रण ठेवतील. वेळापत्रकानुसार करावयाच्या कार्यवाहीत कोणतेही बदल असल्यास उद्योजकांना ते त्वरीत बँका व कृषि व्यापार संघाला कळविणे आवश्यक असते कृषी उद्योजकांना त्यांच्या प्रकल्पाची भौतिक प्रगती, लेखापरीक्षण अहवाल प्रत्येक वर्षी बँक व लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांना सादर करणे आवश्यक असते.

**प्रकल्प विकास सुविधा :-** प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता लघू कृषक कृषि व्यापार संघाकडून देण्यात येणारे खर्च हा उद्योजकाच्या आर्थिक स्थिती, प्रकल्पाची व्याप्ती, प्रकल्पाचे कार्यक्षेत्र व राबविण्यात येणारा उपक्रम यावर अवलंबून असतो. लघू कृषक कृषि व्यापार संघाकडील मान्यताप्राप्त सल्ला संस्था किंवा कंपनीव्दारे तयार करून घेतल्यास त्या संस्थेस/कंपनीस प्रकल्प अहवाल तयार केल्याबाबत रक्कम रू २५०००/- इतकी व्यावसायीक फी, उद्योजक व बँकांकडून खात्री झाल्यानंतर अदा करण्यात येईल.

**पात्र वित्तीय संस्था:**

भारतीय रिझर्व बँकेने सूचित केलेल्या सर्व बँका/वित्तीय संस्था जेथे राज्य/केंद्र शासनाची मालकी ही ५० टक्के पेक्षा जास्त आहे, जसे राष्ट्रीयकृत बँक, भारतीय स्टेट बँक आणि तिच्या उपकंपन्या आयडीबीआय, नाबार्ड, एनसीडीसी, एनईडीएफ, आरआरबीएस व राज्य वित्तीय महामंडळे या पात्र वित्तीय संस्था आहेत.

या योजनेच्या सविस्तर माहितीसाठी कृषि मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली यांच्या www.sfacindia.com या संकेत स्थळाला भेट देण्यात यावी.

**संपर्क-** **व्यवस्थापकीय संचालक,**
**लघू कृषिक कृषि व्यापार संघ,**
**एन. सी. यू. आय. ऑडीटोरीयम बिल्डींग ५वा मजला,**
**ऑगस्ट क्रांती मार्ग, हाउस खास, नवी दिल्ली- ११००१६**
**फोन नं.- ९१-११-२६८६ २३६५**
**फॅक्स नं. - ९१-०११-२६८६ २३६७**
**ई-मेल -** sfac@nic.in
**वेबसाईट -** www.sfacindia.com

## व्हेंचर कॅपिटल अर्थ सहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याची प्रक्रिया-

प्रक्रिया उद्योजक, व्हेंचर कॅपिटल अर्थ सहाय्य योजनेचा अर्ज थेट किंवा लघू कृषक कृषि व्यापार संघामार्फत नियुक्त केलेल्या सल्लगारांच्या सहाय्याने खाली नमुद केलेल्या वित्तीय संस्थां/बँकाकडून मुदत कर्ज मंजूर झालेनंतर चेकलिस्ट प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करून लघू कृषक कृषि व्यापार संघाकडे सादर करू शकतात. लघू कृषक कृषि व्यापार संघ कार्यालयामार्फत उद्योजकाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जाची प्राथमिक छाननी करून लघू कृषक कृषि व्यापार संघ बँक, प्रकल्प उद्योजक व सल्लागार (असल्यास) यांचेकडे प्रस्तावाचा नोंदणी क्रमांक पोहोच पावतीसह पाठविणे तसेच प्रस्तावाच्या पुढील प्रक्रियेकरीता आवश्यक कागदपत्र/ माहिती असे एकाव वेळी मागविण्यात येईल. अर्ज सादर करण्यापुर्वी अर्जदाराने योजनेची मार्गदर्शक तत्वे वाचणे आवश्यक आहे.

प्रस्ताव सादर करताना आवश्यक कागदपत्रांची यादी.

१. उद्योजकाचे फर्म/ कंपनीच्या लेटरहेड वर व्यवस्थापकीय संचालक, लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांच्या नावे विनंती अर्ज.
२. मंजूर प्राधिकरणाचे मंजूरी पत्र.
३. मुदत कर्ज मंजूर करण्याच्या अटींसह बँक प्राधिकरणाची स्वाक्षरी असलेली बँक मंजूर अप्रायझल नोट/प्रकिया नोट.
४. मुदत कर्ज व कॅश क्रेडिट खात्यांचे अद्ययावत स्टेटमेंट (मंजूर असल्यास).
५. इक्विटी प्रमाणपत्र-
   अ) कंपनी मालकी हक्क / भागीदारी बाबत सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र.
   ब) फॉर्म२ (पीएएस ३), फॉर्म ५ (एस ७) व फॉम २३ च्या बदल्यात रजिस्टार ऑफ कंपनीज ने दिलेले कागदपत्र.
६. कच्चा माल पुरवठा करणा-या शेतक-यांबरोबर करार करून तयार केलेली शेतकरी यादी.
७. यापुर्वी व्हेंचर कॅपिटल अर्थ सहाय्य योजनेचा लाभ न घेतल्याबाबत उद्योजकाचे शपथपत्र.
८. उद्योजकाने असुरक्षीत कर्ज घेतले असल्यास त्याचा उल्लेख करावा. याबाबत सनदी लेखापाल यांचेकडून प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
९. नजीकच्या काळातील बँक तपायणी अहवाल.
१०. लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांचे संमतीविना बँक प्राथमिक व कर्जासाठी घेतलेले तारण परत करणार नसल्याबाबत बँकेची हमी.
११. एकूण प्रकल्प किंमतीमध्ये खेळते भांडवालाकरीता घेतलेल्या रक्कमेबाबत खुलासा.

## लघू कृषक कृषि व्यापार संघ, नवी दिल्ली यांचा सामंजस्य करार झालेल्या वित्तीय संस्था/ बँक यांची यादी.

| अ.क्र. | बँक/ वित्तीय संस्था |
|---|---|
| १ | अलाहाबाद बँक |
| २ | युको बँक |
| ३ | बँक ऑफ बरोदा |
| ४. | ओरीएन्टल बँक ऑफ कॉमर्स |
| ५. | पंजाब नॅशनल बँक |
| ६. | सेंट्रल बँक ऑफ इंडीया |
| ७ | कॅनरा बँक |
| ८. | विजया बँक |
| ९. | दि. जम्मु ॲन्ड कश्मिर बँक लि. |
| १०. | सिंडीकेट बँक |
| ११. | बँक ऑफ महाराष्ट्र |
| १२. | युनायटेड बँक ऑफ इंडीया |
| १३. | स्टेट बँक ऑफ बिकानेर ॲन्ड जयपुर |
| १४. | स्टेट बँक ऑफ इंडीया |
| १५. | स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र |
| १६. | इंडीयन बँक |
| १७. | बँक ऑफ इंडीया |
| १८. | देना बँक |
| १९. | युनियन बँक ऑफ इंडीया |
| २०. | स्टेट बँक ऑफ पॅरीस |
| २१. | इंडीयन ओवरसीज बँक |
| २२. | पंजाब ॲन्ड सिंध बँक |
| २३. | कॉपोरेशन बँक |
| २४. | ॲग्री बीझनेस फायनान्स लि. |
| २५. | केरळा फायनासिंअल कॉनोरेशन |
| २६. | वनंचल ग्रामिण बँक |
| २७. | बरोदा गुजरात ग्रामिण बँक |
| २८. | केरळा ग्रामिण बँक |
| २९. | उत्तर पुर्वी विकास फायनान्स कॉपोरेशन (एनइडीएफआय) |
| ३०. | कावेरी ग्रामिण बँक, मैसुर |
| ३१. | प्रगति कृष्णा ग्रामिण बँक, बैलारी |
| ३२. | राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) |
| ३३. | बडोदा उत्तर प्रदेश ग्रामिण बँक |
| ३४. | देना गुजरात ग्रामिण बँक, गांधीनगर |
| ३५. | आसाम ग्रामिण विकास बँक, गुवाहाटी |
| ३६. | सेट्रल मध्यप्रदेश ग्रामिण बँक, मध्यप्रदेश |
| ३७. | आसाम फायनान्सिंअल कॉपोरेशन, आसाम |
| ३८. | ओडीसा स्टेट फायनान्सिंअल कॉपोरेशन |
| ३९. | बिहार ग्रामिण बँक |
| ४० | ग्रामिण बँक ऑफ आर्यावत |
| ४१ | मध्यंचल ग्रामिण बँक, मध्यप्रदेश |